लघु पाटबंधारे योजना ताडील ता. दापोली जि. रत्नागिरी या योजनेस व्दितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**मृद व जलसंधारण विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः सुप्रमा-२०२४/प्र.क्र.४०५/जल-१**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**
**दिनांक: ०५ मे, २०२६.**

वाचा :-

१. ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय लपायो ११९९/प्र. क्र. १६१/९९/जल १, दि. २०.०९.१९९९
२. ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय लपायो १२०८/५२/प्र. क्र. २८/जल १, दि. २७.०२.२००९
३. अपर आयुक्त जलसंधारण तथा मुख्य अभियंता, मृद व जलसंधारण प्रादेशिक क्षेत्र, पुणे यांचे पत्र क्र. जा. क्र. प्रशा-३/३८४७, दि. २९.०७.२०२४
४. दि. १६.०२.२०२६ रोजीच्या व्यय अग्रक्रम समितीच्या बैठकीचे इतिवृत्त दि. २४.०२.२०२६

प्रस्तावना :-

लघु पाटबंधारे योजना ताडील ता. दापोली जि. रत्नागिरी येथे ताडील नाल्यावर सदर योजना प्रस्तावित आहे. प्रस्तुत योजनेची एकूण संकल्पित पाणी साठवण क्षमता ३३५६ स.घ.मी. इतकी असून प्रकल्पातंर्गत एकूण १९५ हे. क्षेत्र सिंचनाखाली आणणे नियोजीत आहे. संदर्भिय शासन निर्णय क्र. १ अन्वये ल.पा. योजना ताडील ता. दापोली जि. रत्नागिरी या योजनेस रु. ६१९.२३ लक्ष रकमेची मूळ प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. तसेच संदर्भिय शासन निर्णय क्र. २ अन्वये या योजनेस रु. १८६९.५ लक्ष रकमेची प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. संदर्भिय पत्र क्र. ३ अन्वये मृद व जलसंधारण विभागाची २०२२-२३ चे दरसुचीवर आधारीत रु. ७९६१.४ लक्ष इतक्या रकमेचा व्दितीय सुधारीत प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे.

सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्तावानुसार लाभव्यय गुणोत्तर १.०२, आर्थिक परतावा दर १२.३३% व प्रती सघमी किंमत रु. २३७२३१/- इतकी आहे. व्दितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यापूर्वी नियोजन विभाग व वित्त विभागाची सहमती घेण्यात आलेली आहे. तसेच व्यय अग्रक्रम समितीच्या दि. १६.०२.२०२६ रोजीच्या बैठकीत सदर योजनेच्या व्दितीय सुधारीत प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावास मान्यता मिळालेली आहे.

प्रथम सु.प्र.मा. किंमतीच्या तुलनेत रू. ६०९१.६५ लक्ष किंमतीची वाढ होत असून सदर रक्कम प्रथम सु.प्र.मा. किंमतीच्या ३२५.८३% इतकी आहे. किंमत वाढीची कारणे पुढीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र | वाढीची कारणे | वाढ (रु.) लक्ष | अधिक्य टक्केवारी % |
|---|---|---|---|
| १ | दरसुचीतील वाढ | १२३५.७१ | ६६.१० |
| २ | निविदा अधिक्य | १४.८७ | ०.८० |
| ३ | भुसंपादनातील वाढ | ३७.२३ | १.९९ |
| ४ | संकल्पचित्रातील वाढ | ३८६.७४ | २०.६९ |
| ५ | परिमाण वाढ/ बचत | ४६३.२१ | २४.७८ |
| ६ | वहन अंतर बदल | ७७९.०६ | ४१.६७ |
| ७ | स्वामित्व शुल्क | ९७६.१५ | ५२.२१ |
| ८ | वस्तु व सेवा कर | ७९८.१७ | ४२.६९ |
| ९ | भाववाढ | ५६७.०८ | ३०.३३ |
| १० | अतिरिक्त बाब दरसुची | ४७०.९६ | २५.१९ |
| ११ | वर्क कॉटीजन्सी व १ टक्के विमा तरतूद | ३६२.७३ | १९.४० |
| | **एकूण** | **६०९१.९१** | **३२५.८४** |

त्यानुषंगाने ल.पा. योजना ताडील, ता. दापोली, जि. रत्नागिरी या योजनेच्या अंदाजपत्रकास व्दितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करणेची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

१. शासन निर्णयाद्वारे ल.पा. योजना ताडील, ता. दापोली, जि. रत्नागिरी या योजनेच्या अंदाजपत्रकास सन २०२२-२३ च्या दरसूचीवर आधारित **रु. ७९,६१,४८,२३६/-(रुपये एकोणऐंशी कोटी एकसष्ट लक्ष अठ्ठेचाळीस हजार दोनशे छत्तीस फक्त)** इतक्या किंमतीच्या प्रस्तावास व्दितीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे. त्यापैकी रु. ७८,०८,७०,९५२/- (रुपये अठ्यात्तर कोटी आठ लक्ष सत्तर हजार नऊशे बावन्न फक्त) इतक्या कामाप्रित्यर्थ रक्कमेची तरतुद आहे. सोबत उपशिर्षनिहाय तरतुदीचा गोषवारा दिलेला आहे.

२. सदर प्रकल्पाचे उर्वरित काम नियोजित वेळेत व सुधारीत प्रशासकीय मान्यता उपशिर्षनिहाय तरतुदीच्या मर्यादेत पूर्ण करण्यात यावे.

३. या योजनेच्या कामावर होणारा खर्च खालील लेखाशिर्षाखाली मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

**लेखाशिर्ष:-**

**मागणी क्रं. ZH-५**

**४७०२, लहान पाटबंधारे योजना**

**४७०२ ए ०२८**

**००**

**१०१, भूपृष्ठ जल,**

**लहान पाटबंधारे**

**(०१) लहान पाटबंधारे योजना,**

**१०१-२५० हे सिंचन क्षमता (कार्यक्रम),**

**५३ मोठी बांधकामे**

४. सुधारीत प्रशासकीय मान्यता खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

४.१ प्रकल्पाच्या उपशिर्षनिहाय मंजूर किंमतीच्या मर्यादेत व नियोजनानूसार काम पूर्ण करण्यात यावे.

४.२ आर्थिक दायित्व निर्माण होईल अशा नविन घटकांचा शासन मान्यतेशिवाय प्रकल्पात समावेश करु नये.

४.३ प्रकल्पाचे काम पूर्ण झाल्यावर सदर प्रकल्पावर ग्रामविकास विभागाचे शा.नि.दि.३१/७/२००० व मृद व जलसंधारण विभागाचे शा.नि.दि.११.०२.२०२२ नुसार पाणी वापर संस्था स्थापन करावी व देखभाल दुरुस्तीसाठी पाणी वापर संस्थाकडे प्रकल्प हस्तांतरीत करण्यात यावा.

४.४ सदर कामाची अमंलबजावणी करताना दर्जा व गुणवत्ता उत्कृष्ट ठेवण्याची जबाबदारी संबधित क्षेत्रिय अधिकाऱ्यांची राहिल.

४.५ प्रकल्पाचे हस्तांतरण झाल्यानंतरचा देखभाल दुरुस्तीचा खर्च लाभार्थ्याकडून करण्यात यावा.

४.६ सुधारीत प्रशासकीय मान्यता म्हणजे प्रकल्प कार्यान्वित करण्याच्या विविध टप्प्यावर क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी घेतलेल्या विविध निर्णयास व क्षेत्रीय अनियमितता झाली असल्यास अशा अनियमिततेस सहमती असल्याचे गृहीत धरता येणार नाही.

४.७ सदर प्रकल्पाचे काम सुधारीत प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेत पुर्ण होईल याची दक्षता घ्यावी. जर प्रकल्प सुधारीत प्रशासकीय मान्यतेच्या किंमतीत पुर्ण होत नसल्यास प्रथम संबंधीत क्षेत्रीय अधिकारी यांचेवर दि. १५.०१.२०१० च्या परिपत्रकानुसार जबाबदारी निश्चित करुन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

५. शासन निर्णय ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्र. नागरी २०११/प्र.क्र.१९२/निधी जल-१, दि. २ फेब्रुवारी, २०१२ अन्वये निर्धारित तरतुदींचे काटेकोर अनुपालन करण्यात यावे.

६. शासन परिपत्रक क्र.प्रमा-२०१३/(७८५/१३)/सिं.व्य.(कामे) दि.१/१/२०१५ मधील मार्गदर्शक सूचनानुसार अभिलेखे ठेवणे व कार्यवाही करणे बंधनकारक आहे.

७. प्रकल्पाची कामे पूर्ण होईपर्यंत प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, ठाणे यांनी त्रैमासिक प्रगती अहवाल शासनास सादर करावा. काम पूर्ण झाल्यानंतर त्याबाबतचे प्रमाणपत्र शासनास त्वरीत उपलब्ध करुन द्यावे.

८. सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी निर्गमित दिनांकापासून करण्यात यावी.

९. सदर योजनेची सुधारीत तांत्रिक मान्यता घेण्यात यावी.

१०. सदर योजनेच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावास वित्त विभागाने खालील अटींच्या अधीन राहून सहमती दर्शवली आहे. खालील अटींची पूर्तता करण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित जिल्हा जलसंधारण अधिकारी यांची राहील.

i. प्रशासकीय मान्यतेत नमूद केलेल्या इतर सर्व अटी सुधारित प्रशासकीय मान्यतेबाबतही लागू होतील.

ii. सुधारीत प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेबाहेर विभागाने खर्च करु नये.

iii. सदर योजनेसंदर्भात आधीच्या कालावधीमध्ये काही आर्थिक व कार्यपध्दतीत अनियमितता झाल्या असतील, कोणतीही नियमबाह्य कार्यवाही करण्यात आली असेल किंवा ज्यामुळे कोणतीही अनियमितता होण्याची शक्यता असेल अशा कोण्याही बाबींना शासनाने सहमती दिली आहे असे म्हणता येणार नाही वा अशी कोणतीही सहमती/मान्यता शासनाने प्रस्तूत कामाबाबत दिलेली नाही.

iv. विभागाने प्रचलित शासन निर्णय, नियम, मार्गदर्शक तत्वे, वित्तीय अधिकार मर्यादा यांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याची जबाबदारी विभागाची राहील.

v. प्रशासकीय मान्यता म्हणजे अहवालातील तांत्रिक बाबी अथवा निविदा विषयक क्षेत्रीय स्तरावरील निर्णयास मान्यता गृहीत धरली जाणार नाही.

११. सदर योजनेच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावास व्यय अग्रक्रम समितीने खालील अटींच्या अधीन राहून सहमती दर्शवली आहे. खालील अटींची पूर्तता करण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित जिल्हा जलसंधारण अधिकारी यांची राहील.

**i. सुधारीत प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेतच काम तातडीने पुर्ण करण्याची दक्षता विभागाने घ्यावी.**

ii. योजनेची अंमलबजावणी करताना प्रचलित शासन निर्णय, नियम, CVC तत्वे, वित्तीय मर्यादा, विहीत निविदा कार्यपद्धती अनुसरणे, आवश्यकतेनुसार राज्य तांत्रिक सल्लागार समितीने प्रकल्पाच्या व कामाच्या अनुषंगाने दिलेल्या निदेशांचे व त्रुटींची पुर्तता करणे याची सर्वस्वी जबाबदारी विभागाची राहील.

iii. सदर सुधारीत प्रशासकीय मान्यता म्हणजे अहवालातील तांत्रिक बाबी, निविदाविषयक क्षेत्रिय निर्णय किंवा अनियमितता यास मान्यता गृहित धरली जाणार नाही. अशा प्रकरणाची तपासणी त्यावेळच्या प्रचलित शासन नियमानुसार करण्याची जबाबदारी विभागाची राहील.

**१२. प्रकल्पाच्या सुधारीत प्रशासकीय मान्यतेच्या किंमतीत वाढ होत असल्यास सदर वाढीसाठी शासनाची पूर्व मान्यता घ्यावी. त्यानंतरच अशा दायित्वास सक्षम स्तरावरून मान्यता घ्यावी.**

१३.विभागाचा मृद व जलसंधारण कामांच्या कार्यपध्दतीबाबतचे शासन निर्णय दि. १२.०८.२०२५ मधील सुचनांचे तंतोतंत पालन होईल याची दक्षता घेण्यात यावी.

सदर शासन निर्णय नियोजन विभाग व वित्त विभाग यांच्या सहमतीने अनुक्रमे नियोजन विभागाचा अनौ.सं.क्र. ३०४/२४/१४३४, दि. २४.०९.२०२४ व वित्त विभागाचा अनौ. सं. क्र. ७२५/ २०२४/ व्यय-१५, दि. ११.१०.२०२४ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे. तसेच संदर्भिय पत्र क्र. ३ अन्वये दि. १६.०२.२०२६ रोजी झालेल्या व्यय अग्रक्रम समितीच्या बैठकीतील निर्णयाच्या अनुषंगाने सदर प्रस्तावास मान्यता देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत आदेश प्रशासनिक विभागांना प्रदान करण्यात आलेल्या शर्तीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन, त्याचा सांकेतांक क्रमांक २०२६०५०५१३०९२२०९२६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRAKASH NILKANTHRAO PATIL

Digitally signed by PRAKASH NILKANTHRAO PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SWCD, 2.5.4.20=A7DC90F966C671A9ACD0A599EE5FC497272E775D33643B14725C6A77432C673F, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F1EC28A96B2A52575AE4CCCA512D1723F249D503AE71CF458BA4863AACFFBF62, cn=PRAKASH NILKANTHRAO PATIL
Date: 2026.05.05 13:11:31 +05'30'

**(प्र. नि. पाटील)**
**कार्यकारी अभियंता तथा अवर सचिव**
**महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
३. मा. विरोधी पक्ष नेता, विधान परिषद/विधान सभा, विधान मंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
४. सर्व मा. संसद सदस्य, विधान मंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य
५. सर्व मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
६. मा. मंत्री (मृद व जलसंधारण) यांचे खाजगी सचिव
७. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
८. सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
९. मा. सचिव (मृद व जलसंधारण) यांचे स्वीय सहाय्यक .
१०. महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परिक्षण), महाराष्ट्र राज्य मुंबई.
११. आयुक्त मृद व जलसंधारण,जल आयुक्तालय, छत्रपती संभाजीनगर.

१२. व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, छत्रपती संभाजीनगर.

१३. अप्पर आयुक्त जलसंधारण तथा मुख्य अभियंता, मृद व जलसंधारण प्रादेशिक क्षेत्र, पुणे.

१४. प्रादेशिक जलसंधारण अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, मृद व जलसंधारण विभाग, ठाणे.

१५. जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, रत्नागिरी.

१६. कक्ष अधिकारी, कार्यासन जल-४, मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई

१७. जल-१ संग्रहार्थ.

**मृद व जलसंधारण विभाग**

**जोडपत्र 'अ'**

**लघु पाटबंधारे योजना ताडील ता. दापोली जि. रत्नागिरी या योजनेस व्दितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याबाबत गोषवारा**

**शासन निर्णय क्रमांकः सुप्रमा-२०२४/ प्र.क्र.४०५/जल-१ दि .: ०५ मे, २०२६.**

| अ.क्र. | शिर्ष/उपशीर्ष कामे | प्रस्तावित अंदाजपत्रक रु. |
|---|---|---|
| | I- Head Works | |
| १. | ए-प्राथमिक | ९,१०,३६१ |
| २. | बी- भुसंपादन | १,५७,०८,२४४ |
| ३. | सी - कामे | |
| | मुख्य धरण | ३९,५९,०८,४७० |
| | सांडवा | ६,९६,६८,३६५ |
| | प्रवेश व पुच्छ कालवा | १७,९९,६६,३५५ |
| ४. | डी- विमोचक | ३,४१,३३,८८२ |
| ५. | के-इमारत | ५,७६,१२१ |
| ६. | एम-वृक्षारोपण | ६०,००० |
| ७. | ओ-संकिर्ण | २,०६,००० |
| ८. | पी-देखभाल व दुरुस्ती | १६,९९,१९३ |
| ९. | आर-दळणवळण | ७१,०९,९०५ |
| १०. | एकूण कामाप्रित्यर्थ | **७०,५९,४६,८९५** |
| | I- Main Canal & Branches | |
| ११. | ए-प्राथमिक | १२,९३,३६९ |
| १२. | बी- भूसंपादन | ०.०० |
| १३. | डी- ऑऊटलेट | ०.०० |
| १४. | इ- फ़ॉल | ०.०० |
| १५. | एफ़- आर. एच.टी. वर्क | ०.०० |
| १६. | जी- ब्रीजेस | ०.०० |
| १७. | एल- मातीकाम | ०.०० |
| १८. | बंदिस्त पाईप कालवा | ७,२४,५२,८६१ |

| | | |
|---|---|---|
| १९. | एम- वृक्षारोपण | ३०,००० |
| २०. | ओ-संकिर्ण | १,८६,६९४ |
| २१. | पी- देखभाल दुरुस्ती | १,८१,१३२ |
| | **एकूण** | **७,४१,४४,०५६** |
| २२. | III-Distributary | ७,८०,००० |
| २३. | **एकूण I+II+III** | **७८,०८,७०,९५२.००** |
| २४. | ETP Charges १०% | १,५२,७७,२८४ |
| | **एकूण** | **७९,६१,४८,२३६.००** |

**(रुपये एकोणऐंशी कोटी एकसष्ट लक्ष अठ्ठेचाळीस हजार दोनशे छत्तीस फक्त)**

PRAKASH NILKANTHRAO PATIL

Digitally signed by PRAKASH NILKANTHRAO PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SWCD, 2.5.4.20=A7DC90F966C671A9ACD0A599EE5FC497272E775D33643B14725C6A77432C673F, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F1EC28A96B2A52575AE4CCCA512D1723F249D503AE71CF458BA4863AACFFBF62, cn=PRAKASH NILKANTHRAO PATIL
Date: 2026.05.05 13:12:04 +05'30'

**(प्र. नि. पाटील)**
**कार्यकारी अभियंता तथा अवर सचिव**
**महाराष्ट्र शासन**